**प्राथमिक आरोग्य केंद्र वरवडे**

ई.मेल :- phcvarawadesindhu@gmail.com


जाआस्था/.व.के.आ.प्रा.क्र./170/ 2026
दि .12/10/2026

## दरपत्रक मागणी

प्राथमिक आरोग्य केंद्र वरवडे ता.कणकवली अंतर्गत दि.12/11/2026 ते दि.13/11/2026 रोजी प्रशिक्षण कार्यक्रमा करिता जेवण व चहा, नाश्ताची व्यवस्था उपलब्ध करुन देणेकरिता खालीलनमुन्यांत बंद लखोटयात दरपत्रके मागविणेत येत आहेत.

| अ. क्र. | तपशिल | वर्णन / प्रमाण | दर रुपये |
|---|---|---|---|
| 1 | चहा साधा | 75 मिली. | |
| 2 | चहा स्पेशल | 75 मिली. | |
| 3 | अल्पोपहार | 150 ते 200 ग्रॅम | |
| 4 | शिरा गोड/उपिट/कांदा पोहे / समोसा/ वडा पाव/साबू वडा/साबू खिचडी/ इडली चटणी/इडली सांभार / पाव भाजी /आंबोळी चटणी मिसळ / मेदू वडा/ दहीवडा | | |
| 5 | शाकाहारी जेवण साधे (मर्यादीत) | 3 चपात्या, दोन मुद भात, प्रत्येकी 1 वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर | |
| 6 | शाकाहारी जेवण साधे (अमर्यादीत) | चपात्या, भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर खाईल तेवढे | |
| 7 | शाकाहारी स्पेशल जेवण (मर्यादीत) | 3 चपात्या / 5 पु-या, दोन मुद मसाला भात, प्रत्येकी 1 वाटी वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई / रस गुल्ले | |
| 8 | शाकाहारी स्पेशल जेवण (अमर्यादीत) | चपात्या / पु-या, मसाला भात, वरण, पातळ भाजी, सुकी भाजी, सोलकडी किंवा दही, पापड, लोणचे, कोशिंबीर व स्वीट डिश पैकी गुलाब जाम / श्रीखंड / बासुंदी / जिलेबी / रस मलाई / रस गुल्ले खाईल तेवढे | |
| 9 | चिकन बिर्याणी | पाव किलो | |
| 10 | मच्छी जेवण (मर्यादीत) | दोन मुद भात, मासा तळलेला, मासा आमटी गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| 11 | मच्छी जेवण (अमर्यादीत) | गरजेनुसार भात, मासा तळलेला, मासा आमटी गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| 12 | चिकन जेवण (मर्यादीत) | 3 पुरी, दोन मुद भात, सुके चिकन 1 वाटी, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| 13 | चिकन जेवण (अमर्यादीत) | पुरी, भात, सुके चिकन, चिकन रस्सा गरजेनुसार, सोलकडी, कोशिंबीर, लिंबू इत्यादी | |
| 14 | व्हेज पुलाव (पाव किलो) | पाव किलो | |

इच्छुक दरपत्रक धारकांनी सदरची दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेपासून 8 दिवसापर्यन्त पर्यन्त दुपारी 3 वाजेपर्यन्त विहीत नमून्यांत परिपूर्ण दरपत्रक बंद लखोटयातून या कार्यालयास सादर करावयाची आहेत. मुदतीत प्राप्त दरपत्रकांची छाननी करून अटी व शर्ती पुर्ण झालेली दरपत्रके खोलून तुलनात्मक तक्याच्या आधारे किफायतशीर दरपत्रक धारकाला पुरवठा आदेश देणेत येईल.

**वैद्यकिय अधिकारी गट - अ**
**प्राथमिक आरोग्य केंद्र वरवडे**
**ता.कणकवली जि.सिंधुदुर्ग**

## दरपत्रक अटी व शर्ती

1) अन्न पदार्थ तयार करणे, पदार्थ वाढणेसाठी आवश्यक भांडी इत्यादी याची व्यवस्था पुरवठादारानेच करावयाची आहेत. तसेच जेवण / नाष्टयानंतरची त्याठिकाणची साफसफाई पुरवठादाराने करावयाची आहे.
2) सर्व अन्नपदार्थांचा दर्जा व चव उत्तम असावी. तसेच सर्व पदार्थ ताजे असावेत.
3) कोणतीही एक किवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता मंजूर अथवा नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवला आहे.
4) कार्यक्रमापुर्वी एक किंवा दोन दिवस आगावू कल्पना दिली जाईल त्यानुसार व्यवस्था करावयाची आहे.
5) जेवण/चहा/नाष्टाचे देयक NEFT/PFMS DBT प्रणालीद्वारे संबधीत मक्तेदाराच्या खातेवर जमा केले जाईल.
6) ठरवून दिलेल्या वेळेत खाद्य पदार्थ दरपत्रकात नमूद वर्णनानुसार व दरानुसार देणे आवश्यक आहे.
7) पुरवठादाराने दरपत्रक सादर करताना कोणतीही अट घालावयाची नाही.
8) ज्या पुरवठादाराची निविदा मंजूर केली आहे त्यांनी वरील सर्व अटींचे पालन न केल्यास कोणतीही सूचना न देता मक्ता रद्द करण्यात येईल.
9) दरपत्रक सादर करणा-या मक्तेदारांनी आपल्या दुकान/संस्था नोंदणी दाखला (उदा. नगरपरिषद/ग्रामपंचायत नोंदणी अथवा जीएसटी नोंदणी दाखला) तसेच नोंदणी पत्रकावर नमुद मालकाच्या पॅन कार्ड अथवा संस्थेच्या पॅन कार्ड ची झेरॉक्स जोडणे आवश्यक आहे.

**संकेतस्थळावर दरपत्रक नोटीस प्रसिध्द झालेच्या तारखेपासून 8 दिवसाच्या मुदतीत दरपत्रक स्वीकारली जातील याची नोंद घ्यावी.**

**दरपत्रक मागणी नोटीस लावण्याचे ठिकाण**

1. www.nrhm.maharashtra.gov.in
2. www.arogya.maharashtra.gov.in
3. तालुका आरोग्य अधिकारी नोटीस बोर्ड
4) प्राथमिक आरोग्य केंद्र वारवडे नोटिस बोर्ड

**Medical Officer**
Primary Health Center Varawade
Tal. Kankavali, Dist. Sindhudurg